ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 16 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आमिर खानचा भाचा इम्रान खान भारतीय नागरिक नाही?





पान 3 वरुन...

महेशदादांची पैलवानकीची नाळ आजही घट्ट!

### दोन नेत्यांना तुरुंगात पाठवल्याच्या निषेधार्थ आंदोलन; राजकारण तापले

# CJP चे 'लहरा दो तिरंगा' आंदोलन!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉकरोच जनता पार्टीचे (CJP) संस्थापक अभिजीत दिपके यांच्या दोन सहकाऱ्यांना तिहार तुरुंगात पाठवण्यात आल्याच्या निषेधार्थ जाहीर करण्यात आलेल्या 'लहरा दो तिरंगा' आंदोलनामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण तापले आहे. शुक्रवारी (दि. १६) सायंकाळी ५ वाजता कनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये राष्ट्रध्वजासह एकत्र येण्याचे आवाहन दिपके यांनी केले आहे. दिल्ली पोलिसांनी या कार्यक्रमाला परवानगी नसल्याचे स्पष्ट केले असून, दिल्ली उच्च न्यायालयाने आंदोलनावर थेट बंदी घालण्यास नकार दिला आहे.**

मतदार याद्यांतील कथित फेरफार आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्याच्या तयारीत असताना १० ऑक्टोबर रोजी अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिल्ली विमानतळावर ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त आहे. जंतर-मंतरवरील आंदोलनाला परवानगी नाकारल्यानेही वाद निर्माण झाला होता. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आंदोलनासाठी परवानगी मागण्याचा अर्ज उशिरा करण्यात आला होता.

१३ ऑक्टोबर रोजी जंतर-मंतर परिसरात राष्ट्रध्वज घेऊन घोषणा दिल्यानंतर CJPचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पोलिसांनी अटक केली. अनधिकृत प्रवेश आणि पोलिसांच्या कामात अडथळा आणल्यासह विविध आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आल्याचे वृत्त आहे. १४ ऑक्टोबर रोजी दोघांनाही पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर दिपके यांनी सहकाऱ्यांच्या अटकेच्या निषेधार्थ 'लहरा दो तिरंगा' आंदोलनाची घोषणा केली.

कनॉट प्लेसमधील व्यापारी आणि विक्रेत्यांचे संभाव्य नुकसान तसेच कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून आंदोलन रोखण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर १५ ऑक्टोबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली.



न्यायालयाने आंदोलनावर थेट बंदी घातली नाही. पोलिसांनी आवश्यक कायदेशीर उपाययोजना करण्याची हमी दिल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आंदोलनाबाबत पोलिसांकडून कोणती पावले उचलली जातात, याकडे लक्ष लागले आहे.

अभिजीत दिपके यांच्या मते, राष्ट्रध्वजासह शांततापूर्ण निदर्शने करणे हा लोकशाहीतील अभिव्यक्तीच्या अधिकाराचा भाग आहे. दुसरीकडे, पोलिसांनी आंदोलनस्थळावरील निर्बंध, कायदा-सुव्यवस्था आणि नियमांच्या कथित उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित केला आहे. या प्रकरणात आंदोलकांची भूमिका आणि पोलिसांची बाजू स्वतंत्रपणे तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे. या आंदोलनाला आम आदमी पक्षाचे नेते सौरभ भारद्वाज यांनी समर्थन दिल्याचे वृत्त आहे. त्यांनी समर्थकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केल्याचेही सांगण्यात आले आहे. त्यामुळे CJPच्या आंदोलनाला विरोधी पक्षांकडून मिळणाऱ्या पाठिंब्यामुळे दिल्लीतील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

मतदार याद्यांतील कथित फेरफाराचे आरोप, दोन नेत्यांची अटक आणि आंदोलनाच्या परवानगीवरून निर्माण झालेला वाद यामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण तापले आहे. शुक्रवारी नियोजित आंदोलन शांततेत पार पडते का आणि पोलिसांची भूमिका काय राहते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### आंदोलनामागील भूमिका काय?

अभिजीत दिपके यांच्या मते, राष्ट्रध्वजासह शांततापूर्ण निदर्शने करणे हा लोकशाहीतील अभिव्यक्तीचा अधिकार आहे. मात्र, पोलिसांचे म्हणणे आहे की कारवाईचा संबंध आंदोलनस्थळावरील निर्बंध, कायदा-सुव्यवस्था आणि नियमांच्या कथित उल्लंघनाशी आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या भूमिका स्वतंत्रपणे तपासणे आवश्यक आहे. या आंदोलनाला आम आदमी पक्षाचे नेते सौरभ भारद्वाज यांनी समर्थन दिल्याचे वृत्त आहे. त्यांनी समर्थकांना दिपके यांच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केल्याचेही सांगण्यात आले आहे.

### काय घडले? जाणून घ्या घटनाक्रम

- १० ऑक्टोबर: मतदार याद्यांतील कथित फेरफाराविरोधात आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्याच्या तयारीत असताना अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिल्ली विमानतळावर ताब्यात घेण्यात आले.
- १० ऑक्टोबर: जंतर-मंतरवरील आंदोलनाला परवानगी नाकारल्याचा वाद निर्माण झाला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, परवानगीसाठी अर्ज उशिरा करण्यात आला होता.
- १३ ऑक्टोबर: जंतर-मंतर परिसरात राष्ट्रध्वज घेऊन घोषणा दिल्यानंतर सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पोलिसांनी अटक केली. अनधिकृत प्रवेश आणि पोलिसांच्या कामात अडथळा आणल्यासह विविध आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आल्याचे वृत्त आहे.
- १४ ऑक्टोबर: दोन्ही नेत्यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर दिपके यांनी सहकाऱ्यांच्या अटकेच्या निषेधार्थ 'लहरा दो तिरंगा' आंदोलनाची घोषणा केली.
- १५ ऑक्टोबर: कनॉट प्लेसमधील व्यापारी आणि विक्रेत्यांच्या संभाव्य नुकसानीच्या कारणावरून आंदोलन रोखण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने थेट बंदी घातली नाही; पोलिसांनी आवश्यक कायदेशीर उपाययोजना करण्याची हमी दिली.

# शहरात पाणीकपात; कालवा मात्र सुरू

## शेतीच्या कालव्यातील पाण्यातही १० ते २० टक्के कपातीचे नियोजन; आजपासून अंमलबजावणी

**महाईन्यूज । पुणे**

**पावसाने ओढ दिल्यामुळे शहरात आज, गुरुवारपासून (१५ ऑक्टोबर) दहा टक्के पाणीकपातीच्या निर्णयाची अंमलबजावणी होत असताना, जिल्ह्यातील रब्बी हंगामातील शेतीसाठी कालव्यातून दिले जाणारे आवर्तन मात्र कायम ठेवण्यात आले आहे. मात्र आवर्तनातील पाण्यात परिस्थितीनुसार दहा टक्क्यांपासून वीस टक्क्यांपर्यंत कपात करण्याचे जलसंपदा विभागाचे नियोजन असून उन्हाळी हंगामातील आवर्तनही बंद करण्याचे जलसंपदा विभागाच्या विचाराधीन आहे. मात्र, त्यासंदर्भातील अंतिम निर्णय पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीमध्ये येत्या शुक्रवारी (१६ ऑक्टोबर) होणाऱ्या बैठकीत घेतला जाणार आहे. शेती आणि शहराच्या पाणीपुरवठ्याचा समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असा दावाही जलसंपदा विभागाकडून करण्यात आला आहे.**



‘एल-निनो’च्या प्रभावामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांनी दहा टक्के पाणीकपात करावी, असा आदेश जलसंपदा विभागाने दिला आहे. त्यानुसार महापालिकेने आठवड्यातील प्रत्येक गुरुवारी पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी आज, गुरुवारपासून होणार आहे. या पार्श्वभूमीवर कालव्यातून रब्बी हंगामासाठी सोडल्या जाणाऱ्या पाण्याबाबत काय निर्णय होणार, याबाबत चर्चा सुरू झाली होती. मात्र, कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यातही कपात करण्याचे नियोजन जलसंपदा विभागाने केले आहे.

जिल्ह्याच्या काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सिंचनासाठी २५ सप्टेंबरपासून कालव्यातून आवर्तन सोडण्यात सुरुवात करण्यात आली आहे. आवर्तन सुरू झाल्यापासून ४५ दिवस कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडले जाणार आहे. मात्र, आवर्तनाचा कालावधी पंचवीस ते तीस दिवसांपर्यंत करण्यात येणार असून दहा ते वीस टक्क्यांपर्यंत कालव्यातून दिल्या जाणाऱ्या पाण्यात कपात करण्यात येईल, असे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, आत्तापर्यंत १.७३ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढे पाणी कालव्यातून देण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार धरणातील पाणी पिण्यासाठी येत्या ३१ ऑगस्ट पर्यंत राखीव ठेवण्यात येणार असून देण्यात आले असून रब्बी हंगामासाठीचे आवर्तन शेवटचे प्राधान्य आहे. त्यादृष्टीने हे नियोजन करण्यात आले असून राज्याच्या उपमुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली येत्या शुक्रवारी होणाऱ्या बैठकीत त्यासंदर्भातील अंतिम निर्णय होईल.

जिल्ह्यातील दौंड, इंदापूर आणि बारामतीमधील रब्बी हंगामासाठी कालव्यातून सध्या पाणी दिले जात आहे. खडकवासला धरणातील पाण्यावर ग्रामीण भागाचाही हक्क आहे. त्यामुळे ते पूर्णपणे बंद करता येणार नाही. रब्बी हंगामात पिकांच्या वाढीसाठी महत्त्वाच्या टप्प्यावर पाणी आवश्यक असते. त्यामुळे आवर्तन पूर्णत: बंद करण्याऐवजी ते कमी करण्यात येईल, असा दावा जलसंपदा विभागाकडून करण्यात आला. मात्र, आवर्तनातील पाण्यात कपात झाल्यास त्याचा परिणाम शेतीवरही होण्याची शक्यता आहे.

### धरणसाखळीत २५.७६ टीएमसी पाणीसाठा

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पात सध्या २५.७६ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी याच दिवशी पाणीसाठा २९.०७ टीएमसी एवढा होता. गतवर्षीच्या तुलनेत ३.३१ टीएमसीची घट आहे. सध्या सुरू असलेले रब्बी आवर्तन, कडक उन्हामुळे होणारे बाष्पीभवन आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता डिसेंबरनंतर पाणीसाठ्यात झपाट्याने घट होण्याचा अंदाज जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. खडकवासला धरणात ०.७४, पानशेत धरणात ९.४३ टीएमसी, वरसगाव धरणात ११.९३ आणि टेमघर धरणात ३.६६ टीएमसी पाणीसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# परवानगी मिळेपर्यंत पुण्यात बाईक टॅक्सी बंद करा; जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

**महाईन्यूज । पुणे**

**बाईक टॅक्सीला शासनाची अधिकृत परवानगी मिळालेली नसल्याने प्रायोगिक असो किंवा नियमित, तिची वाहतूक तातडीने बंद करा. अन्यथा प्रशासनाला कारवाई करावी लागेल, असा इशारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी गुरुवारी ((दि.१५)) दिला. तसेच, ॲपद्वारे रिक्षा प्रवासासाठी स्वतःचे भाडेदर ठरवणाऱ्या ॲग्रीगेटर कंपन्यांच्या मनमानीला आळा घालण्याच्या सूचनाही त्यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिल्या.**



बाईक टॅक्सीच्या वाहतुकीसह ॲग्रीगेटर कंपन्यांच्या नियमबाह्य कारभाराबाबत वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डुडी यांनी गुरुवारी विविध संघटना, वाहतूक पोलिस आणि संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. या बैठकीत रिक्षा संघटनांनी बाईक टॅक्सीला परवानगी देऊ नये, अशी मागणी केली. यावेळी रिक्षा पंचायतचे अध्यक्ष नितीन पवार यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

रिक्षांचे भाडेदर निश्चित करण्याचा अधिकार प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला असताना ॲग्रीगेटर कंपन्या ॲपवर स्वतःचे दर दाखवून त्यानुसार भाडे आकारतात. यामुळे मीटरनुसार भाडे देण्याऐवजी प्रवाशांकडून ॲपवरील दरांचा आग्रह धरला जातो, असे पवार यांनी निदर्शनास आणून दिले. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सहमती दर्शवत संबंधित कंपन्यांच्या मनमानी भाडेदरांवर नियंत्रण आणण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिल्या. बैठकीला प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, पिंपरी-चिंचवडचे वाहतूक पोलिस उपायुक्त विक्रांत देशमुख, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले, तसेच विविध रिक्षा संघटनांचे पदाधिकारी आणि ॲग्रीगेटर कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत बाईक टॅक्सी सेवेमुळे पारंपरिक रिक्षा व्यवसायावर होणाऱ्या परिणामांबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. रिक्षाचालकांना व्यवसाय करताना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, नियमांचे पालन करणाऱ्या चालकांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिका संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडली. ॲग्रीगेटर कंपन्यांनी प्रवाशांकडून भाडे आकारताना शासनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तसेच वाहनांची कागदपत्रे, परवाने आणि विमा यांसारख्या आवश्यक बाबींची काटेकोर तपासणी करण्याची मागणी करण्यात आली. बेकायदेशीररीत्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची गरजही उपस्थितांनी अधोरेखित केली. प्रवाशांची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेतील शिस्त राखण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही सूचित करण्यात आले.

# महेशदादांची पैलवानकीची नाळ आजही घट्ट!

## आई अंबाबाईच्या महाआरतीला वस्ताद आणि मल्लांची उपस्थिती



## गुलशे तालमीतील संस्कारांचा जागवला आठवणींचा पट



**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**आखाड्यातील मेहनत, वस्तादांनी दिलेले संस्कार आणि मातीशी जुळलेले नाते जपणारे आमदार महेश लांडगे यांच्यासाठी नवरात्रोत्सवाची चौथी माळ विशेष ठरली. आई अंबाबाईच्या महाआरतीनिमित्त शहरातील ज्येष्ठ मल्ल, मार्गदर्शक वस्ताद आणि पुण्यातील गुलशे तालमीतील पैलवान सवंगडी एकत्र आले. त्यांच्या भेटीने आमदार लांडगे यांच्या कुस्तीच्या प्रवासातील आठवणींना उजाळा मिळाला.**

पै. महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच यांच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात चौथ्या माळेनिमित्त महाआरतीचा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी कुस्ती क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले. शक्तीची साधना करणाऱ्या पैलवानांच्या देवीभक्तीमुळे सोहळ्यात भक्ती आणि शक्तीचा संगम अनुभवायला मिळाला.

आमदार महेश लांडगे स्वतः पैलवान असल्याने कुस्तीपटू, वस्ताद आणि कुस्ती क्षेत्राशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. पुण्यातील गुलशे तालमीत त्यांनी कुस्तीचे धडे गिरवले. याच तालमीतील मित्र आणि मार्गदर्शक महाआरतीसाठी आल्याने आखाड्यातील सराव, मेहनतीचे दिवस आणि वस्तादांच्या मार्गदर्शनाच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. सार्वजनिक जीवनातील जबाबदाऱ्या सांभाळतानाही तालमीतील सवंगड्यांप्रती त्यांची आपुलकी या भेटीतून अधोरेखित झाली.

### जुन्या सवंगड्यांचा भावनिक क्षण...

पैलवानांसाठी कुस्ती ही केवळ शारीरिक ताकदीची स्पर्धा नसून शिस्त, संयम, निष्ठा आणि संस्कारांची साधना असते. आमदार लांडगे यांच्या जीवनातही या तालमीतील संस्कारांना विशेष स्थान आहे. त्यामुळे जुन्या सवंगड्यांची ही भेट केवळ औपचारिक भेट न राहता संघर्षाच्या आणि जडणघडणीच्या प्रवासाला उजाळा देणारा भावनिक क्षण ठरली. या भेटीबाबत भावना व्यक्त करताना आमदार लांडगे म्हणाले, “ज्या मातीने मला घडवलं, ज्या तालमीने संस्कार दिले आणि ज्या वस्तादांनी मार्गदर्शन केलं, त्यांच्याप्रतीची कृतज्ञता कायम आहे. आज पैलवान मित्र आणि मार्गदर्शकांच्या भेटीने तालमीतील दिवस पुन्हा डोळ्यांसमोर उभे राहिले. ही नाती आणि आठवणी माझ्यासाठी कायम प्रेरणेचा ठेवा आहेत.” देवीच्या आराधनेसोबतच कुस्तीच्या मातीतून जुळलेल्या नात्यांचा स्नेह या सोहळ्यात दिसून आला. आमदार लांडगे यांच्या पैलवानकीच्या प्रवासातील सहकाऱ्यांच्या उपस्थितीने नवरात्रोत्सवाच्या चौथ्या माळेला आपुलकीची किनार लाभली.

> “पैलवान हा भक्ती आणि शक्तीची उपासना करणारा साधक असतो. तालमीच्या मातीने मला ताकद दिली, वस्तादांनी शिस्त शिकवली आणि सवंगड्यांनी आयुष्यभराची साथ दिली. आज आई अंबाबाईच्या आरतीनिमित्त ही जिवाभावाची माणसं भेटली आणि कुस्तीच्या आखाड्यातील आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. आयुष्यात जबाबदाऱ्या कितीही वाढल्या, तरी मला घडवणाऱ्या मातीशी आणि कुस्तीच्या परिवाराशी असलेली नाळ कायम जपणार आहे.”
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# शिल्पा गवारे मृत्यू प्रकरणाला वेग; लवकरच आरोपपत्र दाखल होणार!

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**वाकड येथील शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरणाचा पोलिसांकडून तपास सुरू असून, लवकरच न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात येणार आहे. या प्रकरणात अटक केलेल्या सासरच्या मंडळींना अद्याप जामीन मिळालेला नसल्याची माहिती राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली. मंगळवारी (दि. १३) शिल्पा यांच्या माहेरच्या मंडळींची भेट घेतल्यानंतर त्या प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.**

शिल्पा सचिन गवारे यांनी २७ ऑगस्ट २०२६ रोजी वाकड येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी त्यांचे भाऊ संतोष कलाटे यांनी वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार शिल्पा यांचे पती सचिन उत्तम गवारे यांच्यासह सासरच्या चार जणांना पोलिसांनी अटक केली. सर्व आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

दरम्यान, शिल्पा यांची आत्महत्या नसून घातपात झाल्याचा आरोप त्यांच्या माहेरच्या मंडळींनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कलाटे कुटुंबीयांशी दूरध्वनीवरून संवाद साधत हा खटला जलदगती न्यायालयात चालविण्याचे आश्वासन दिले आहे. या पार्श्वभूमीवर रहाटकर यांनी कलाटे कुटुंबीयांची भेट घेऊन प्रकरणाची माहिती जाणून घेतली.

पोलिसांकडून प्रकरणातील सर्व बाबींची नोंद घेऊन उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपपत्र तयार केले जाईल. तसेच, कायद्यातील तरतुदी आणि लावण्यात आलेल्या कलमांनुसार आरोपींच्या जामिनाचा निर्णय अवलंबून असतो, असे रहाटकर यांनी स्पष्ट केले. या भेटीदरम्यान चिंचवडचे आमदार शंकर जगताप, नगरसेविका स्नेहा कलाटे, संतोष कलाटे आणि रणजित कलाटे उपस्थित होते.

### हुंडाबळी रोखण्यासाठी मानसिकता बदला!

हुंड्याच्या नावाखाली महिलांचा छळ होणे ही गंभीर सामाजिक समस्या आहे. केवळ कायद्याची अंमलबजावणी करून हा प्रश्न सुटणार नाही, तर समाजाची मानसिकताही बदलणे आवश्यक आहे. महिलांवरील अत्याचारांविरोधात नागरिकांनी पुढे येऊन आवाज उठवावा, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.



### हुंड्यासाठी छळ होणे दुर्दैवी

समाज आधुनिकतेकडे वाटचाल करीत असतानाही महिलांना हुंड्यासाठी त्रास दिला जाणे ही दुर्दैवी बाब असल्याचे रहाटकर यांनी नमूद केले. हुंड्याच्या नावाखाली महिलांचा होणारा छळ ही गंभीर सामाजिक समस्या आहे. अशा घटना रोखण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच समाजाची मानसिकताही बदलण्याची गरज



## भूमिका

**महाराष्ट्रातील सुमारे पाऊण भागात दुष्काळ जाहीर झाल्यानंतरही शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचण्यास विलंब होत आहे. दुष्काळाच्या झळांनी खरीप हंगाम उद्ध्वस्त झाला असताना, रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना आर्थिक आधाराची गरज आहे. मात्र, सरकारकडून पाहणी दौरे, बैठका आणि घोषणांचा सिलसिला सुरू आहे.**

# दुष्काळात घोषणांचा सुकाळ, शेतकरी मात्र बेहाल!



दुष्काळ जाहीर केल्यानंतर १९ दिवसांनी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर झाली. ही रक्कमही शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या तुलनेत अपुरी असून, प्रत्यक्ष मदत मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आश्वासनांपेक्षा कृतीची गरज आहे.

दुष्काळाचे गांभीर्य ठरवताना केवळ राज्यातील सरासरी पर्जन्यमानाचा विचार करून चालणार नाही. अनेक भागांत पावसाची मोठी तूट असून, काही ठिकाणी पावसातील खंडामुळे पिके पूर्णपणे करपली आहेत. एखाद्या परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्याची पावसाची सरासरी वाढते आणि प्रत्यक्ष नुकसान होऊनही तो भाग मदतीच्या निकषांबाहेर राहतो. त्यामुळे पर्जन्यमान, जमिनीतील ओलावा, पीकनिहाय नुकसान, भूजलपातळी आणि अपेक्षित उत्पादनातील घट या बाबींचा शास्त्रीय अभ्यास करून मदतीचे निकष निश्चित करणे आवश्यक आहे.

दुष्काळग्रस्त भागांत लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांचे दौरे सुरू आहेत. मात्र, एकाच ठिकाणी वारंवार भेटी देऊन शेतकऱ्यांच्या पदरात काय पडणार? पाहणी दौऱ्यांमधून परिस्थितीचे मूल्यमापन झाले पाहिजे आणि त्यानुसार तातडीने निर्णय घेतले गेले पाहिजेत. अकोला जिल्ह्यातील काही गावांमध्ये हेक्टरी एक किलोपेक्षाही कमी सोयाबीन उत्पादनाची नोंद होणे, हे संकट किती गंभीर आहे, याची जाणीव करून देते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी आणखी किती काळ वाट पाहायला लावणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

दुष्काळाचे संकट केवळ पिकांपुरते मर्यादित नाही. पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता हेदेखील गंभीर प्रश्न आहेत. डिसेंबरनंतर अनेक भागांत पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेता, जलसाठ्यांचे नियोजन, टँकरची व्यवस्था आणि चारा उपलब्धता यासाठी आतापासूनच ठोस पावले उचलली पाहिजेत. केवळ धोरण मंजूर करून उपयोग नाही; त्याची प्रभावी अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे.

महसूल, वीजदेयके आणि परीक्षा शुल्कातील सवलती तसेच कर्जवसुलीला स्थगिती दिल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळू शकतो. मात्र, या उपाययोजनांमुळे बुडालेले पीकउत्पन्न भरून निघणार नाही. त्यासाठी थेट आर्थिक मदत आवश्यक आहे. रब्बीच्या पेरणीचा काळ सुरू असताना मदतीला होणारा विलंब शेतकऱ्यांना कर्जाच्या खाईत ढकलू शकतो. नैसर्गिक संकटावर सरकारचे नियंत्रण नसले, तरी प्रशासकीय दिरंगाई टाळणे सरकारच्या हातात आहे. त्यामुळे मदतीची रक्कम पुरेशी ठेवून ती विनाविलंब शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी. अन्यथा, दुष्काळात घोषणांचा सुकाळ आणि शेतकऱ्यांच्या वाट्याला निराशाच, असे दुर्दैवी चित्र कायम राहील.

## प्रासंगिक »

# गोठलेली घंटा

**एका गावात जुन्या मंदिराच्या प्रवेशद्वारावर मोठी घंटा होती. गावात काही संकट आले की घंटा वाजवून सर्वांना एकत्र बोलावले जायचे.**

एके दिवशी जोरदार वादळामुळे घंटेला बांधलेली दोरी तुटली. गावकऱ्यांनी ती दुरुस्त करण्याऐवजी नवीन घंटा आणण्याचा निर्णय घेतला.

गावातील आरव नावाचा मुलगा मात्र म्हणाला, “आधी जुनी घंटा दुरुस्त करून पाहूया.” त्याच्या बोलण्याकडे कुणी लक्ष दिले नाही. आरवने स्वतः दोरी आणली, शिडी लावली आणि गावातील लोहाराची मदत घेतली. काही वेळात घंटा पुन्हा तयार झाली.

दुसऱ्याच दिवशी नदीला अचानक पूर आला. आरवने घंटा जोरात वाजवली. आवाज ऐकताच गावकरी सावध झाले आणि त्यांनी वेळेत सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. अनेकांचे प्राण वाचले.

गावकऱ्यांना आपली चूक समजली. नवीन वस्तू आणण्याची घाई करण्यापेक्षा उपलब्ध साधनांचा योग्य वापर करणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांना उमगले.

- तात्पर्य : कोणतीही समस्या सोडवताना घाई करण्यापेक्षा विचारपूर्वक कृती करणे अधिक महत्त्वाचे असते.

डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणाऱ्या भारतात यूपीआय ही सामान्य नागरिकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. भाजीविक्रेत्यापासून मोठ्या व्यापाऱ्यापर्यंत सर्वत्र मोबाइलद्वारे पैसे देण्याची सुविधा सहज उपलब्ध झाली आहे.

# यूपीआय शुल्काचा तिढा चर्चेतूनच सुटेल!




अशा वेळी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या निवडक व्यापारी यूपीआय व्यवहारांवर प्रस्तावित ०.४ टक्के मर्चंट डिस्काउंट रेट्च्या अंमलबजावणीला दिवाळीपर्यंत स्थगिती मिळणे, हा व्यापाऱ्यांसाठी तात्पुरता दिलासा आहे. मात्र, स्थगिती म्हणजे प्रश्नाचे निराकरण नव्हे. डिजिटल व्यवहारांचा खर्च कोण उचलणार, याबाबत स्पष्ट धोरण आवश्यक आहे.

यूपीआयच्या लोकप्रियतेचे प्रमुख कारण म्हणजे त्याची सहजता आणि शुल्कमुक्त व्यवहारांची सुविधा. सुट्ट्या पैशांची अडचण दूर होणे, व्यवहारांची नोंद उपलब्ध होणे आणि पैशांचे त्वरित हस्तांतरण यामुळे या व्यवस्थेचा स्वीकार वेगाने वाढला. आता शुल्क आकारण्याचा प्रस्ताव मांडताना या यशामागील कारणांचा विचार करायला हवा. शुल्क थेट व्यापाऱ्यांकडून आकारले जाणार असले, तरी वाढलेल्या खर्चाचा भार अप्रत्यक्षपणे ग्राहकांवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेषतः कमी नफ्यावर व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांसाठी हे शुल्क अडचणीचे ठरू शकते. मोठ्या विक्रीदालनांची आर्थिक क्षमता आणि छोट्या दुकानदारांची परिस्थिती यांत फरक असतो. त्यामुळे सर्वांना एकाच निकषात बसवणे योग्य ठरणार नाही. दुसरीकडे, डिजिटल व्यवहारांची सुरक्षित यंत्रणा उभी करणे आणि तिचे व्यवस्थापन करण्यासाठी खर्च येतो, हेही नाकारता येणार नाही. मात्र, हा खर्च किती आहे आणि नव्या शुल्काची आवश्यकता काय, याची पारदर्शक माहिती समोर आली पाहिजे.

शुल्कामुळे छोटे व्यापारी पुन्हा रोखीच्या व्यवहारांकडे वळले, तर डिजिटल अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याच्या उद्दिष्टालाच धक्का बसू शकतो. म्हणून व्यापारी संघटना, बँका आणि ग्राहक प्रतिनिधींशी चर्चा करून सर्वांना परवडणारी व्यवस्था निर्माण करावी. छोट्या व्यापाऱ्यांसाठी स्वतंत्र तरतुदी आणि शुल्काची वाजवी मर्यादा निश्चित करणे गरजेचे आहे.

डिजिटल भारताचे यश केवळ व्यवहारांच्या वाढत्या संख्येत नाही, तर नागरिकांच्या विश्वासात आहे. दिवाळीपर्यंत मिळालेली स्थगिती हा कायमस्वरूपी तोडगा ठरू शकत नाही. शुल्काबाबतची अनिश्चितता दूर करून सर्वसमावेशक धोरण निश्चित करावे. डिजिटल व्यवहारांचा विस्तार करताना सामान्य नागरिक आणि छोट्या व्यापाऱ्यांच्या हिताचे रक्षण झाले पाहिजे. कारण डिजिटल युगात निर्णयाचा वेग महत्त्वाचा असला, तरी त्यामागील विवेक आणि दूरदृष्टी अधिक महत्त्वाची आहे.

## ।। अभंगवाणी ।।



जेणें घडे नारायणीं अंतराय ।
होत बाप माय वर्जावीं तीं ॥१॥

येर प्रिया पुत्र धना कोण लेखा ।
करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'डी.लिट.' पदवी

## अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचा १७ ऑक्टोबरला दीक्षांत समारंभ

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वर्धा येथील अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चच्या वतीने 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' (डी.लिट.) ही मानद पदवी प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेच्या १७ व्या दीक्षांत समारंभात हा सन्मान करण्यात येणार असून, शैक्षणिक क्षेत्रातील या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाकडे विदर्भासह राज्याचे लक्ष लागले आहे. येत्या १७ ऑक्टोबर रोजी सावंगी मेघे येथील दत्ता मेघे सभागृहात दुपारी दोन वाजता हा समारंभ आयोजित करण्यात आला आहे.**



या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे (एनएमसी) अध्यक्ष डॉ. अभिजित शेठ यांनाही 'डॉक्टर ऑफ सायन्स' (डी.एससी.) ही मानद पदवी प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान आणि पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव, असे या सोहळ्याचे स्वरूप असणार आहे.

अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चच्या कुलपती डॉ. प्रीती जी. अदाणी या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या कार्यक्रमासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वर्धा आणि भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर तसेच हिंगणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समीर मेघे यांची विशेष उपस्थिती अपेक्षित आहे.

याशिवाय संस्थेचे विश्वस्त डॉ. मलय महादेविया, सागर मेघे आणि कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या कुलसचिव डॉ. श्वेता काळे पिसुळकर आणि परीक्षा नियंत्रक डॉ. आदर्शलता सिंग यांनी कार्यक्रमासंदर्भातील माहिती दिली आहे.

२०२५ पासून ही संस्था अदाणी फाऊंडेशनशी संबंधित व्यवस्थापनाखाली आली. त्यानंतर २०२६ मध्ये संस्थेचे नामकरण 'अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च' असे करण्यात आले. या बदलामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत नवा टप्पा सुरू झाला आहे. संस्थेच्या शैक्षणिक विस्तारामध्ये जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज आणि शरद पवार डेंटल कॉलेज यांच्यासह आयुर्वेद, फार्मसी, नर्सिंग, फिजिओथेरपी आणि अभियांत्रिकी शिक्षणाशी संबंधित महाविद्यालयांचा समावेश आहे. विविध अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञान आणि इतर व्यावसायिक क्षेत्रांमध्ये शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. संस्थेने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि आरोग्यसेवेच्या क्षेत्रात सातत्याने प्रयत्न केले आहेत. उपलब्ध वृत्तानुसार, संस्थेला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद अर्थात नॅकच्या चौथ्या मूल्यांकन चक्रात ४ पैकी ३.७८ गुणांसह 'ए प्लस प्लस' श्रेणी प्राप्त झाली आहे. तसेच राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) संस्थेचा ४९ वा क्रमांक नमूद करण्यात आला आहे. दीक्षांत समारंभ हा कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. शिक्षण पूर्ण करून व्यावसायिक क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीची दखल घेण्याबरोबरच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देण्याचे काम या सोहळ्यातून होते.

### चार दशकांच्या शैक्षणिक परंपरेचा नवा अध्याय

सावंगी मेघे येथील या संस्थेचा शैक्षणिक प्रवास अनेक वर्षांचा आहे. दत्ता मेघे यांच्या पुढाकारातून उभ्या राहिलेल्या शैक्षणिक संस्थेने वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. १९८८ मध्ये संस्थेच्या नोंदणीपासून सुरू झालेल्या या प्रवासाला १९९० मध्ये जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजच्या स्थापनेमुळे महत्त्वाची दिशा मिळाली. त्यानंतर १९९१ मध्ये शरद पवार डेंटल कॉलेजची स्थापना करण्यात आली. २००५ मध्ये या संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला. कालांतराने वैद्यकीय शिक्षणाबरोबरच संशोधन, आरोग्यसेवा आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून संस्थेचा विस्तार झाला. या वाटचालीतून विदर्भातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात संस्थेने महत्त्वाचे स्थान निर्माण केले.

# MPSC चौकशी समितीच्या सचिव पदाच्या नियुक्तीबाबत तुकाराम मुंढेंचं मोठं वक्तव्य

**महाईन्यूज । मुंबई**

**गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीच्या परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. या विरोधात राज्यभरात आणि विशेषतः पुण्यात विद्यार्थ्यांनी मोठं आंदोलन देखील केलं. त्यानंतर राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेत एमपीएससीच्या परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांचा तपास करण्यासाठी चौकशी आयोगाची स्थापना करण्याची घोषणा केली.**





तसेच एमपीएससी चौकशी आयोगाचे सचिव म्हणून तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्याची घोषणा मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पुण्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनात बोलताना केली होती.

दरम्यान, आता एमपीएससीच्या परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांच्या चौकशी आयोगाचे सचिव म्हणून नियुक्तीच्या संदर्भातील प्रश्नावर बोलताना तुकाराम मुंढे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. तुकाराम मुंढे यांची आज (१५ ऑक्टोबर) पत्रकार परिषद पार पडली. यावेळी पत्रकारांनी तुकाराम मुंढे यांना त्यांच्या एमपीएससीच्या चौकशी समितीच्या सचिव पदाच्या नियुक्तीबाबत प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना तुकाराम मुंढे यांनी मोठं भाष्य केलं. 'आमच्यात तोंडी चर्चा झाली. पण अद्याप माझ्याकडे नियुक्तीचं अधिकृत पत्र आलेलं नाही', असं तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे चर्चांना पुन्हा एकदा उधाण आलं आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांचा तपास करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी आयोगाची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा राज्य सरकारकडून करण्यात आली. या चौकशी आयोगाच्या अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांची नियुक्ती, तर चौकशी आयोगाच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली होती. दरम्यान, 'एमपीएससी'चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात विद्यार्थ्यांनी आंदोलन केलं होतं, या आंदोलनात बोलाताना मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी ही घोषणा केली होती.

### तुकाराम मुंढेंनी काय म्हटलं?

एमपीएससीच्या परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांचा तपास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या एमपीएससी चौकशी आयोगाचे सचिव म्हणून तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा काही दिवसांपूर्वी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली. याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देताना तुकाराम मुंढे म्हणाले की, "माझ्याकडे नियुक्तीचं कोणतंही अधिकृत पत्र अद्याप आलेलं नाही. किंवा त्या संदर्भातील माझ्याकडे अद्याप कोणतेही आदेश नाहीत. पण आमच्यात तोंडी चर्चा नक्कीच झालेली आहे. मात्र, जोपर्यंत माझ्याकडे अधिकृत नियुक्तीचं पत्र येत नाही, तोपर्यंत त्यावर अधिक काही प्रतिक्रिया देणं योग्य नाही. मी फक्त नियुक्तीच्या बातम्या मीडियात पाहिल्या, ऐकल्या आणि वाचल्या. तेवढीच माहिती माझ्याकडे आहे", असं तुकाराम मुंढेंनी म्हटलं आहे.

# दिपके, बोरा यांच्या पत्रकार परिषदेत गोंधळ

## मोदी-शाहांनी एका माणसासाठी जनतेविरोधात युद्ध पुकारल्याची सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंची टीका

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी गुरुवारी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर कडाडून टीका केली. “निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांना वाचविण्यासाठी या दोघांनी स्वतःच्या देशातील लोकांविरुद्ध युद्ध पुकारले आहे. ज्ञानेश कुमारांचा राजीनामा मागणाऱ्या आंदोलकांना, विरोधी पक्षातील नेत्यांना तुरुंगात डांबण्याचे कारण काय?”, असा सवाल दिपके यांनी यावेळी विचारला. दरम्यान या पत्रकार परिषदेत काही लोकांनी घुसखोरी करत गोंधळही घातला. दिपके आणि इतरांविरोधात त्यांनी घोषणाबाजी केली.**



पत्रकार परिषदेत बोलत असताना अभिजीत दिपके यांनी सीजेपीचे सह-संयोजक सौरव दास आणि आशुतोष रांका यांच्या तिहार तुरुंगातील न्यायालयीन कोठडीवरून संताप व्यक्त केला. एका माणसासाठी देशातील तरुणांना आणि विरोधी पक्षातील नेत्यांना तुरुंगात डांबले जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

अभिजीत दिपके पुढे म्हणाले, “विरोधी पक्ष आणि दिल्लीतील तरुण रस्त्यावर उतरून संताप व्यक्त करत आहेत. त्यांना पोलीस रस्त्यावरून फरफटत नेत आहेत. नेहा, आएशा आणि इतर अनेक विद्यार्थी नेत्यांना पोलिसांनी फरफटत ताब्यात घेतले. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल, पिनराई विजयन यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांना ताब्यात घेतले. हे कशासाठी? एकट्या ज्ञानेश कुमार यांच्यासाठी एवढे का सुरू आहे?”

आशुतोष रांका आणि सौरव दास यांनी फक्त तिरंगा फडकवला म्हणून त्यांना ताब्यात घेण्यात आले. भाजपाला तिरंग्याची अडचण काय? ज्ञानेश कुमार हे तिरंग्यापेक्षा मोठे आहेत का?, असा प्रश्न उपस्थित करताना दिपके यांनी म्हटले की, यांना पूर्वीपासून तिरंग्याचा तिटकारा आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांच्यापैकी कोण होते, हे विचारले तर ते सांगू शकणार नाहीत. यासाठीच ते सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, सरदार वल्लभभाई पटेल यांना स्वतःकडे ओढतात. तुमच्यापैकी कोण स्वातंत्र्याच्या चळवळीत होते, हे तर सांगा. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत बराच काळ तिरंगा फडकवला जात नव्हता, अशी टीका अभिजीत दिपके यांनी केली.

जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनाच्या कव्हरेजदरम्यान महिला पत्रकारांवर झालेल्या कथित मारहाण आणि लैंगिक छळाच्या प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. या सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी तंत्रज्ञानाच्या या युगात पत्रकार आणि सोशल मीडियासाठी रील बनवणारे कन्टेन्ट क्रिएटर्स यांच्यात नेमका फरक कसा करायचा?, असा महत्त्वाचा सवाल उपस्थित केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत सुप्रीम कोर्टाने या आरोपांची चौकशी करण्यासाठी एक विशेष समिती स्थापन करण्याचे संकेत दिले आहेत.

### पत्रकार परिषदेत अज्ञातांचा गोंधळ

दरम्यान पत्रकार परिषदेची सुरुवात झाल्यानंतर नेहा बोरा संबोधित करत असताना काही अज्ञातांनी घोषणाबाजी करत पत्रकार परिषदेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली आणि पत्रकार परिषदेत खंड पडला. मात्र त्यानंतर गोंधळ घालणाऱ्यांना बाहेर काढण्यात आले आणि पत्रकार परिषद पुढे गेली. यावेळी अभिजीत दिपके यांनी आरोप केला की, ५०, १०० रुपयांसाठी हे लोक इथे गोंधळ घालत आहेत. त्यांना पैसे देऊन टाका, म्हणजे ते निघून जातील. यानंतर पत्रकार परिषदेत एकच हशा पिकला. १० ऑक्टोबरच्या आंदोलनाबाबत बोलताना दिपके म्हणाले, या आंदोलनापूर्वी रेल्वे, मेट्रो सेवा बंद करण्यात आली. एवढे सगळे कुणाला वाचविण्यासाठी सुरू आहे.

# अमेरिकेत हिंदू मंदिरावर गोळीबाराचा कट उधळला; १९ वर्षीय तरुण अटकेत

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**अमेरिकेच्या इलिनॉय राज्यातील ऑरोरा येथील एका हिंदू मंदिरात मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्याचा कट उघडकीस आला आहे. हिंदू मंदिरात गोळीबार करण्याचा कट उघडकीस आल्यानंतर एका १९ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. या तरुणाने हा कट रचला होता अशी माहिती प्राथमिक चौकशीत समोर आली आहे. आता या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता आहे.**




या प्रकरणात हिंदूविरोधी आणि वर्णद्वेषी द्वेष असल्याचं निष्पन्न झाल्यानंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी अमेरिकेच्या प्रशासनाकडे भारतीय समुदायाला सुरक्षा पुरवण्याची मागणी केली आहे. तसेच या घटनेचा सखोल तपास करून कठोर कारवाई करण्याचं आवाहनही जयस्वाल यांनी केलं आहे. याबाबत परराष्ट्र मंत्रालयाने निवेदन जारी केलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

पोलिसांनी सांगितलं की, या तरुणाने गोळीबाराच्या योजनेचा एक आराखडा असलेलं एक दस्तऐवज, रायफल, मॅगझिन्स, बॉडी आर्मर आणि आणखी काही उपकरण आढळून आले आहेत. पोलिसांना असा संशय आहे की, या तरुणाने ११ ऑक्टोबर रोजी ऑरोरा येथील एका हिंदू प्रार्थनास्थळाला लक्ष्य करून हल्ल्याची योजना आखली होती. अमेरिकी माध्यमांच्या वृत्तानुसार, हा तरुण आपल्या घरापासून त्या हिंदू मंदिरापर्यंत गाडी चालवत गेला. यावेळी त्याच्याकडे रायफल आणि ३०० गोळ्या आणि बॉडी आर्मर होतं असं वृत्तात म्हटलं आहे. मात्र, जेव्हा त्याने गोळीबार करण्याचा प्रयत्न केला तेव्हा रायफल अडकली. त्यामुळे त्याचा प्लॅन फसला आणि तो पळून गेला. त्यानंतर त्याला पोलिसांनी अटक केली. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी याबाबत एक निवेदन जारी केलं आहे. रणधीर जयस्वाल म्हणाले की, “या कटामागे असलेली हिंदूविरोधी आणि वर्णद्वेषी भावना व भारतीय वंशाच्या लोकांविरुद्ध हिंसाचाराचा उल्लेख असणं हे अतिशय चिंताजनक आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर आम्ही अमेरिकी प्रशासनाला कठोर कारवाई करण्याचं आवाहन करत आहोत. भारताने या घटनेची नोंद घेतली आहे.

### नेमकं घटना काय घडली?

अमेरिकेतील इलिनॉय राज्यातील ऑरोरा या ठिकाणी असलेल्या एका हिंदू मंदिरात मोठ्या प्रमाणावर गोळीबार करण्याचा कट उघडकीस आला आहे. या प्रकरणात १९ वर्षीय अलेक्झांड्रोस पापोराकिस या तरुणाला अटक करण्यात आली आहे. अटकेच्या कारवाईनंतर पोलिसांना एक आठ पानांचा जाहीरनामा त्याच्याकडे सापडला आहे. त्यामध्ये भारतीय वंशाच्या लोकांविरुद्ध हिंसाचाराचा उल्लेख आढळून आल्याचा दावा करण्यात आला आहे. संशयिताला अटक करण्यात आली आहे.



# क्रिती सेनॉन हॉरर चित्रपटात दिसणार

अभिनेत्री क्रिती सेनॉन एका हॉरर चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकतीच तिच्या आगामी प्रोजेक्टबद्दल माहिती समोर आली आहे. गेल्या काही वर्षांत हॉरर चित्रपटांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली असून प्रेक्षकांकडून या प्रकारच्या चित्रपटांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. मात्र, हा चित्रपट प्रेक्षकांना खऱ्या अर्थाने भीतीचा सामना करायला लावणारा आहे. मिडिया रिपोर्टनुसार, 'भेडिया' नंतर कृती सॅनॉनला मॅडॉक फिल्म्सकडून एक बिग बजेट चित्रपटाची ऑफर मिळाला आहे. क्रितीने या नव्या चित्रपटासाठी होकार दिला असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, चित्रपटाची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. यामध्ये क्रिती पहिल्यांदाच एका वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. सध्या या प्रोजेक्टवर काम सुरु असून प्री-प्रोडक्शनला सुरुवात झाल्याचे सांगितले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून क्रिती मॅडॉक फिल्म्ससोबत जोडलेली आहे. मॅडॉक फिल्म्स ही निर्मिती संस्था 'भेडिया', 'स्त्री' आणि 'स्त्री २' सारख्या हॉरर-कॉमेडी जॉनरच्या निर्मितीसाठी ओळखली जाते. मात्र, या प्रोडक्शन हाऊसने 'मुंज्या' आणि 'रुही' यांसारखे हॉरर चित्रपटही निर्मित केले आहेत. कृतीचा हॉरर चित्रपट या यादीतील तिसरा चित्रपट असेल.



# इम्रान खानला आंदोलनात सहभागी होणं पडलं महागात

बॉलिवूड अभिनेता आमिर खानचा भाचा आणि अभिनेता इम्रान खान याच्यासमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. मुंबई पोलिसांनी इम्रान खानला २८ ऑक्टोबरपर्यंत भारत सोडण्याची नोटीस दिल्याचं वृत्त समोर आलं आहे. मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर झालेल्या एका आंदोलनात सहभागी झाल्यानंतर त्याच्यावर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आलं होतं. या प्रकरणामुळे चित्रपटसृष्टीसह राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आलं होतं. या आंदोलनात अभिनेता इम्रान खानही सहभागी झाला होता. आंदोलनादरम्यान मुंबई पोलिसांनी इम्रान खानसह काही जणांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या घटनेनंतर इम्रान खानच्या नागरिकत्वाचा आणि भारतात राहण्याच्या परवानगीचा मुद्दा समोर आला. इम्रान खान हा भारतीय नागरिक नसून परदेशी नागरिक किंवा ओसीआय (OCI) कार्डधारक असल्याचं वृत्तात नमूद करण्यात आलं आहे. यानंतर मुंबई पोलिसांनी त्याला २८ ऑक्टोबरपर्यंत भारत सोडण्याचे निर्देश दिल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, या नोटिशीचा नेमका कायदेशीर आधार, त्यातील अटी आणि इम्रान खान यांची अधिकृत बाजू याबाबत सविस्तर माहिती समोर येणं महत्त्वाचं आहे.

# 'जेलर 2'ची रिलीज आधीच बॉक्स ऑफिसवर धूम!

दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत यांच्या आगामी 'जेलर 2' या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच त्याच्या ॲडव्हान्स बुकिंगच्या आकड्यांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. या चित्रपटाने जगभरात ॲडव्हान्स बुकिंगमधून 140 कोटी रुपयांचा टप्पा पार केल्याचा दावा काही वृत्तांमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या कमाईबाबतही मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. रजनीकांत यांच्या चाहत्यांमध्ये या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. रजनीकांत यांचा चित्रपट प्रदर्शित होणार म्हटलं की चाहत्यांमध्ये उत्साहाचं वातावरण निर्माण होतं. त्यांच्या चित्रपटांना दक्षिण भारतात मोठा प्रतिसाद मिळतो. 'जेलर 2'च्या बाबतीतही असंच चित्र पाहायला मिळत आहे. भारतातील विविध भागांसह परदेशातील काही बाजारपेठांमध्येही चित्रपटाच्या तिकिटांची आगाऊ विक्री सुरू असल्याचं वृत्त आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, चित्रपटाच्या जागतिक ॲडव्हान्स बुकिंगमधून 140 कोटी रुपयांपेक्षा अधिक कमाई झाल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या आकड्याची अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने तो अंतिम समजता येणार नाही. दक्षिण भारतात रजनीकांत यांचा मोठा चाहतावर्ग आहे. त्यामुळे तामिळ चित्रपटांच्या बाजारपेठेत या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, हिंदी भाषिक भागांमध्ये दक्षिण भारताइतकीच उत्सुकता दिसते का, याकडेही चित्रपट व्यापाराचं लक्ष लागलं आहे. 'जेलर 2'च्या पहिल्या दिवसाच्या कमाईबाबतही अनेक अंदाज व्यक्त केले जात आहेत. वृत्तानुसार, हा चित्रपट भारतात पहिल्या दिवशी सुमारे 35 कोटी रुपयांची कमाई करू शकतो. मात्र, हा केवळ अंदाज असून प्रत्यक्ष कमाई चित्रपटाच्या प्रदर्शनानंतरच स्पष्ट होईल. रजनीकांत यांच्या मागील चित्रपटांच्या कमाईशी तुलना केली, तर 'जेलर 2'कडून मोठ्या अपेक्षा असल्याचं दिसतं. 2025 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कुली' या चित्रपटाने ॲडव्हान्स बुकिंगमध्ये 65 कोटी रुपयांची कमाई केल्याचा दावा करण्यात आला होता. या चित्रपटाने तामिळ चित्रपटसृष्टीतील ओपनिंगचे विक्रमही चर्चेत आणले होते.



# ५ षटकांचा सामना, एका षटकात ८ चेंडू!

## 'हाँगकाँग सुपर सिक्सेस' स्पर्धेचे अनोखे नियम; जाणून घ्या संपूर्ण फॉरमॅट

**महाईन्यूज । हाँगकाँग**

**छोटं मैदान, ११ ऐवजी अवघे ६ खेळाडू आणि चौकार-षटकारांचा पाऊस यामुळे जगभरातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष वेधून घेणारी 'हाँगकाँग सुपर सिक्सेस' स्पर्धा पुन्हा एकदा रंगणार आहे. ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार टीम इंडियाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. क्रिकेटच्या इतर फॉरमॅटपेक्षा ही स्पर्धा पूर्णपणे वेगळी असून, तिचे नियम आणि खेळण्याची पद्धत अत्यंत रंजक आहे.**



या स्पर्धेत प्रत्येक संघात यष्टिरक्षकासह केवळ सहा खेळाडू असतात आणि सामना प्रत्येकी ५-५ षटकांचा खेळवला जातो. साखळी सामन्यांमध्ये प्रत्येक षटकात नेहमीप्रमाणे ६ चेंडू असतात; मात्र या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे अंतिम सामन्यात प्रत्येक षटकात ६ ऐवजी ८ चेंडू टाकले जातात. पाच षटकांचा खेळ असल्याने यष्टिरक्षक वगळता संघातील इतर पाची खेळाडूंना प्रत्येकी एक षटक गोलंदाजी करणे बंधनकारक असते. तसेच गोलंदाजाने वाईड किंवा नो-बॉल टाकल्यास फलंदाजी करणाऱ्या संघाला एकाऐवजी थेट दोन अतिरिक्त धावा दिल्या जातात.

फलंदाजीच्या नियमांमध्येही अनेक वेगळे प्रयोग या स्पर्धेत पाहायला मिळतात. कोणत्याही फलंदाजाने ५० धावा पूर्ण केल्यास त्याला सक्तीने 'रिटायर' व्हावे लागते. मात्र संघातील इतर सर्व गडी बाद झाल्यास तो पुन्हा मैदानात फलंदाजीसाठी येऊ शकतो. याशिवाय पाच गडी बाद झाल्यानंतर शिल्लक राहिलेला शेवटचा फलंदाज धावांसाठी एकटाच फलंदाजी करू शकतो; यासाठी दुसऱ्या टोकाला नॉन-स्ट्रायकर धावपटूची (रनर) मदत घेतली जाते. हा सामना अवघ्या ४५ मिनिटांत संपत असल्याने प्रेक्षकांसाठी तो कमालीचा थरारक ठरतो. सामना अनिर्णित राहिल्यास किंवा पावसामुळे पूर्ण न झाल्यास रनरेटच्या आधारे निकाल निश्चित केला जातो.

यंदा या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी होत असून त्यांची चार गटांत विभागणी करण्यात आली आहे. यात 'अ' गटात ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि हाँगकाँग (चीन); 'ब' गटात श्रीलंका, बांगलादेश आणि स्कॉटलँड; 'क' गटात भारत, पाकिस्तान आणि यूएई; तर 'ड' गटात दक्षिण आफ्रिका, ओमान आणि अफगाणिस्तान या संघांचा समावेश आहे. भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असल्याने साखळी फेरीतच या दोन्ही पारंपारिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये हायव्होल्टेज लढत पाहायला मिळणार आहे.

### असे आहेत ४ गट

- अ गट- ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, हाँगकाँग चीन
- ब गट- श्रीलंका, बांगलादेश, स्कॉटलँड
- क गट- टीम इंडिया, पाकिस्तान, यूएई
- ड गट- दक्षिण आफ्रिका, ओमान, अफगाणिस्तान

# मराठमोळ्या विश्वजीत मोरेने अमेरिकेत इतिहास घडवला!

**महाईन्यूज । मुंबई**

**भारताचा कुस्तीपटू विश्वजित रामचंद्र मोरेने गुरुवारी अंडर-२३ जागतिक कुस्ती स्पर्धेत इतिहास घडवला. पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत जॉर्जियाच्या कोबा कारुमिद्झेकडून १२-१३ असा निसटता पराभव झाल्याने त्याला रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. मात्र, या कामगिरीसह अंडर-२३ जागतिक कुस्ती स्पर्धेत ग्रीको-रोमन प्रकारात रौप्यपदक जिंकणारा विश्वजित हा पहिला भारतीय कुस्तीपटू ठरला.**



विश्वजित सुवर्णपदक जिंकण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता. मात्र, अखेरच्या काही सेकंदांत कारुमिद्झेने आघाडी घेत विजेतेपदावर नाव कोरलं. अंतिम फेरीत पोहोचून विश्वजितने यापूर्वीच इतिहास घडवला होता. अंडर-२३ जागतिक कुस्ती स्पर्धेच्या ग्रीको-रोमन प्रकारात अंतिम फेरी गाठणारा तो पहिला भारतीय ठरला होता.

यापूर्वीच्या स्पर्धांमध्ये कांस्यपदक जिंकलेल्या विश्वजितने यंदाच्या मोहिमेची सुरुवात मेक्सिकोच्या आयझॅक मारिन माताविरुद्ध १०-८ अशा निसटत्या विजयाने केली. त्यानंतर उपांत्यपूर्व फेरीत त्याने २० वर्षांखालील गटातील विद्यमान जागतिक विजेता इराणच्या आर्मिन शम्सीपूरचा ८-१ असा पराभव केला. या लढतीत विश्वजितने चार गुण मिळवून देणारा थ्रो केला. यादरम्यान शम्सीपूरच्या खांद्याला दुखापत झाल्याचंही दिसून आलं.

उपांत्य फेरीत विश्वजितने रशियाच्या मलिक गिगिएव्हला ७-४ असं नमवत अंतिम फेरीत धडक मारली. हा सामनाही चुरशीचा झाला. दुसरीकडे, कोबा कारुमिद्झेने उपांत्य फेरीत किर्गिस्तानच्या बार्सबेक असनकोझोएव्हचा पराभव करत अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं होतं. अंडर-२३ जागतिक कुस्ती स्पर्धेत ग्रीको-रोमन प्रकारात भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून देण्याची संधी विश्वजित मोरेकडे होती. मात्र, अंतिम फेरीत झालेल्या निसटत्या पराभवामुळे त्याला रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. या पदकासह विश्वजितने या स्पर्धेतील आपल्या दोन कांस्यपदकांच्या कामगिरीत आणखी एका पदकाची भर घातली.

उपांत्यपूर्व फेरीत इटलीच्या लॉरा गोडिनोकडून तिला ९-१० असा निसटता पराभव स्वीकारावा लागला. भारताच्या अन्य ग्रीको-रोमन कुस्तीपटूंना मात्र पदकाच्या फेरीपर्यंत मजल मारता आली नाही. चेतनला ६३ किलो वजनी गटातील उपउपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला, तर ८७ किलो वजनी गटात करण कंबोजला पात्रता फेरीत तांत्रिक श्रेष्ठतेच्या आधारे पराभवाचा सामना करावा लागला.

### भारतीय कुस्तीपटूंची कांस्यपदकासाठीची लढत कायम

महिलांच्या गटात कोमलला उपांत्य फेरीत युक्रेनच्या अलिना फिलिपोविचकडून तांत्रिक श्रेष्ठतेच्या आधारे पराभव पत्करावा लागला. मात्र, तिची कांस्यपदक जिंकण्याची संधी अद्याप कायम आहे. ६८ किलो वजनी गटात दीक्षा मलिकही कांस्यपदकाच्या शर्यतीत आहे. दुसरीकडे, मानसी लाठरचं आव्हान संपुष्टात आलं. उपांत्यपूर्व फेरीत इटलीच्या लॉरा गोडिनोकडून तिला ९-१० असा निसटता पराभव स्वीकारावा लागला. भारताच्या अन्य ग्रीको-रोमन कुस्तीपटूंना मात्र पदकाच्या फेरीपर्यंत मजल मारता आली नाही. चेतनला ६३ किलो वजनी गटातील उपउपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला, तर ८७ किलो वजनी गटात करण कंबोजला पात्रता फेरीत तांत्रिक श्रेष्ठतेच्या आधारे पराभवाचा सामना करावा लागला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शुक्रवार ।

दि. 16 ऑक्टोबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### आमदार महेश लांडगेंच्या उपस्थितीत रणनीतीला अंतिम स्वरूप; पाचही जागा जिंकण्याचा निर्धार

# विजयासाठी भाजपाची बूथनिहाय व्यूहरचना!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**आगामी पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजपा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, प्रभारी आणि कार्यकर्त्यांची एकत्रित नियोजन बैठक आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत पार पडली. निवडणुकीची पूर्वतयारी, प्रचार यंत्रणेचे नियोजन आणि मतदारांशी प्रभावी संपर्क साधण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.**



> "शिक्षक आणि पदवीधर हे समाजाच्या प्रगतीला दिशा देणारे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या अपेक्षा आणि प्रश्न समजून घेऊन त्यांच्याशी सातत्याने संवाद साधणे, ही आमची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली पुण्यासह राज्यातील पाचही जागांवर विजय मिळवण्याचा संकल्प भाजपाने केला आहे. संघटनाची ताकद आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या बळावर हा संकल्प साकार होईल, असा विश्वास आहे."
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजपा-महायुतीच्या उमेदवार डॉ. स्मितादेवी योगेश जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार श्री. कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारासाठी संघटनात्मक यंत्रणा अधिक सक्रिय करण्यावर भर देण्यात आला. मतदार संपर्क, बूथनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप आणि पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधील समन्वय अधिक मजबूत करण्याबाबत आमदार लांडगे यांनी मार्गदर्शन केले.

पदवीधर आणि शिक्षक मतदारांच्या अपेक्षा, स्थानिक प्रश्न व अडचणी समजून घेण्यासाठी त्यांच्याशी सातत्यपूर्ण संवाद साधणे आवश्यक असल्याचे लांडगे यांनी सांगितले. मतदारांपर्यंत पोहोचताना त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. प्रत्येक स्तरावरील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापली जबाबदारी ओळखून नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रचारातील सातत्य आणि परस्पर समन्वयाच्या माध्यमातून मतदार संपर्काला गती देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. दोन्ही उमेदवारांना पहिल्या पसंतीचे मत मिळवून देण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली पुण्यासह राज्यातील पाचही जागांवर विजय मिळवण्याचा संकल्प पक्षाने केला आहे, असेआमदार लांडगे यांनी यावेळी स्पष्ट केले. पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. दोन्ही मतदारसंघांतील नोंदणीकृत मतदारांनी आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.



## पहिल्या पसंतीच्या मतांसाठी विशेष रणनीती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली पुण्यासह राज्यातील पाचही विधान परिषद जागांवर विजय मिळवण्याचे भाजपाचे लक्ष्य आहे. संघटनात्मक ताकद, बूथनिहाय नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या समन्वयातून हे लक्ष्य साध्य करण्यासाठी पक्षाने मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

## पाचही जागा जिंकण्याचा भाजपाचा संकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली पुण्यासह राज्यातील पाचही विधान परिषद जागांवर विजय मिळवण्याचे भाजपाचे लक्ष्य आहे. संघटनात्मक ताकद, बूथनिहाय नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या समन्वयातून हे लक्ष्य साध्य करण्यासाठी पक्षाने मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

# डीपी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## तिघांना अटक, ५ लाखांचा मुद्देमाल जप्त; गुन्हे शाखा युनिट-३ची कामगिरी

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विद्युत रोहित्र (डीपी) चोरी करून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या तिघांना गुन्हे शाखा युनिट-३ने अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी डीपी चोरीच्या सहा गुन्ह्यांची उकल करत सुमारे ५ लाख ९१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई आळंदी, दिघी आणि चाकण पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्ह्यांच्या तपासादरम्यान करण्यात आली.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीण भागात विद्युत डीपी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी अशा गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट-३चे पथक तपास करत होते.

दरम्यान, दिघी आणि आळंदी परिसरात डीपी चोरी करणाऱ्या आरोपींबाबत पोलिसांना माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा शोध घेतला. तपासात आरोपींकडून डीपीमधील तांब्याच्या तारा चोरी करून त्यांची विक्री केली जात असल्याचे समोर आले.

या प्रकरणात मुरलीधर गौतम जैस्वार (वय ४५), विनोद हरिराम जैस्वार (वय ४०) आणि मनीष महेंद्र प्रसाद (वय ३८) या तिघांना अटक करण्यात आली आहे. तिन्ही आरोपी उत्तर प्रदेशातील रहिवासी असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यांच्या चौकशीत चोरीच्या गुन्ह्यांबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी विविध ठिकाणांहून मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत डीपी चोरीशी संबंधित आळंदी पोलीस ठाण्यातील पाच आणि दिघी पोलीस ठाण्यातील एका अशा एकूण सहा गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ५ लाख ९१ हजार रुपये असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

पोलीस उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३च्या पथकाने ही कामगिरी केली. पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत वायसीएम रुग्णालयात रक्तदान शिबिर संपन्न

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि वायसीएम रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. वायसीएम रुग्णालयातील चाणक्य हॉल येथे आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये एकूण १९५ जणांनी नोंदणी केली, त्यापैकी १०४ रक्तदात्यांनी प्रत्यक्ष रक्तदान केले. यामध्ये ८५ पुरुष आणि १९ महिला रक्तदात्यांचा समावेश होता.**




महापालिकेचे मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले. सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलजा भवसार आणि नोडल वैद्यकीय अधिकारी डॉ. छाया शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले.

रक्तदान हे गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेल्या रुग्णांना आवश्यकतेनुसार सुरक्षित रक्त उपलब्ध व्हावे, तसेच नागरिकांमध्ये नियमित रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. 'सेवा संकल्प अभियानाच्या' माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर महापालिकेचा भर आहे.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी महापालिकेच्या कुटुंबकल्याण विभागाचे आणि वायसीएम रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागाचे विशेष सहकार्य लाभले. रक्तपेढीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. नीता तायडे आणि डॉ. हर्षदा बाविस्कर यांनी शिबिराच्या नियोजनात व अंमलबजावणीत मोलाचे योगदान दिले. संबंधित वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे या उपक्रमासाठी विशेष योगदान लाभले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना रक्तदानासह विविध आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांच्या सक्रिय सहभागातून निरोगी समाजाच्या निर्मितीस हातभार लागेल, असा विश्वास महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.



> रक्तदान हे सामाजिक बांधिलकी जपण्याचे आणि गरजू रुग्णांना मदत करण्याचे प्रभावी माध्यम आहे. नागरिकांनी नियमित रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा आणि अशा आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांसाठी नियमितपणे मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येते. नागरिकांनी या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# चांगला वकील होण्यासाठी चांगला श्रोता व्हा!

## ॲड. डॉ. हेमंत चव्हाण यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र; 'विधी आरंभ २०२६' उत्साहात

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**एस.एस.पी. शिक्षण संस्थेच्या जी. एस. पाटील विधी महाविद्यालय, चिखली येथे एलएल.बी. प्रथम वर्ष (शैक्षणिक वर्ष २०२६-२७) विद्यार्थ्यांसाठी "विधी आरंभ २०२६" हा इंडक्शन (स्वागत व मार्गदर्शन) कार्यक्रम सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.**




कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ व सायबर कायद्याचे तज्ज्ञ ॲड. डॉ. हेमंत बाजीराव चव्हाण उपस्थित होते. त्यांनी "क्लासरूम टू कोर्टरूम : लॉ इन द डिजिटल एज" (कक्षेपासून न्यायालयापर्यंत : डिजिटल युगातील कायदा) या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल व मार्गदर्शक विचार मांडले. विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला देताना ॲड. चव्हाण म्हणाले, "भविष्यात एक यशस्वी व चांगला वकील व्हायचे असेल, तर सर्वात आधी एक चांगला श्रोता होणे अत्यंत गरजेचे आहे. डिजिटल युगात कायदे आणि तंत्रज्ञानाची सांगड घालून अभ्यासू वृत्ती ठेवल्यास यश नक्कीच मिळते."

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.एस.पी. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. एस. बी. पाटील हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी आयुष्यात वकिलांशी आलेले विविध अनुभव आणि जी. एस. पाटील विधी महाविद्यालय सुरू करतानाचा यशस्वी प्रवास उपस्थितांसमोर मांडला.

या प्रसंगी महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या नवप्रविष्ट विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार बी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीवर कार्यशाळा संपन्न

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**येथील डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमांतर्गत (QIP) प्रायोजित "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) च्या बी. फार्मसी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**



या कार्यशाळेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. विनायक जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी नवीन अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने प्राध्यापकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा, असे प्रतिपादन केले. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर अध्यापनातील सहाय्यक साधन म्हणून करावा; मात्र, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेवर, चिकित्सक विचारशक्तीवर आणि बौद्धिक विकासावर विपरीत परिणाम होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यशाळेत डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबई येथील स्कूल ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. राकेश सोमानी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या नवीन बी. फार्मसी अभ्यासक्रमाची रचना, उद्दिष्टे आणि प्रभावी अंमलबजावणी यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. सतीश पोळशेट्टीवार यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने फार्मसी शिक्षणातील अध्यापन व अध्ययन प्रक्रिया अधिक प्रभावी, आधुनिक आणि विद्यार्थी-केंद्रित कशी करता येईल, याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. शिल्पा चौधरी यांनी सुधारित अभ्यासक्रमानुसार प्रभावी अध्यापन व अध्ययन पद्धती विकसित करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉ. रेवन करोडी यांनी परीक्षा पद्धती आणि अध्ययन निष्पत्तीशी संलग्न मूल्यमापन प्रक्रिया यांविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यशाळेला विविध महाविद्यालयांतील ७५ हून अधिक प्राध्यापकांनी उपस्थिती नोंदवली. या कार्यशाळेमुळे प्राध्यापकांना नवीन अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती मिळाली असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मदत होईल, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या फार्माकोग्नोसी विभागाचे विभागप्रमुख डॉ. रेवण करोडी यांना त्यांच्या संशोधन आणि उत्कृष्ट शैक्षणिक कार्यासाठी महाविद्यालयातर्फे 'उत्कृष्ट प्राध्यापक' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. शिल्पा चौधरी व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. विद्यार्थी प्रतिनिधी दीक्षा पांडे आणि माही पहाडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. वैभव वैद्य यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे विश्वस्त श्री तेजस पाटील व संकुल संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

# Navratri: Nine Nights of Devotion and Faith

Student Name: Aditi Bhagwan Bangar
Grade: Jasmine
Roll No.: 23
School: RKL Galaxy International School



India is often called the land of festivals. India's festive calendar reflects the country's diverse cultural traditions and spiritual heritage. The festive season generally begins with the arrival of the month of Shravan, popularly known as Shravan Maas. Festivals like Ganesh Chaturthi, Navratri, Dussehra, Diwali, Holi, Eid, and Makar Sankranti take place throughout the year. These festivals carry religious importance, cultural significance, and joy, bringing people together across the nation. Among all these celebrations, Navratri holds a special place as a festival of devotion, dance, and the triumph of good over evil.

As the rhythmic beats of the dhol fill the air, colourful attire brightens the streets, and lamps light up homes and temples, people celebrate Navratri with great enthusiasm. It is not just a festival of music, dance, and devotion but also a reminder of the victory of truth over evil.

The word Navratri is derived from the Sanskrit words Nava and Ratri, meaning nine nights. Navratri is observed in honour of Goddess Durga and her various forms, including Goddess Mahishasuramardini. Each form represents a divine quality and tells a unique story, inspiring devotees to embrace courage, wisdom, purity and,Compassion. The festival symbolizes the triumph of divine power over negative forces and wrongdoing, reinforcing the belief that goodness can overcome the greatest challenges.

Navratri begins on the first day of the Hindu month of Ashwin and ends with Dussehra. Throughout these nine days, different regions across India celebrate the festival in their own unique ways. In Gujarat, Garba and Dandiya Raas bring communities together through coordinated dance and music. In West Bengal, artistic idols, beautifully decorated pandals, religious ceremonies, and cultural programmes mark the grand celebration of Durga Puja. In Northern India, communities come together to celebrate Dussehra with Ravan Dahan, symbolising Lord Rama's victory over Ravana.



The significance of Navratri extends beyond its public celebrations. Commonly known as the festival of Shakti or Adi Shakti, it honours the divine feminine energy associated with creation, preservation, courage, and transformation. In a world where inequality and discrimination still exist, Navratri provides an opportunity to reaffirm the importance of respecting women, recognising their contributions, and protecting their dignity.

Religious traditions should not be limited to these nine days but should be practised throughout the year. As responsible and dutiful citizens, we must preserve the values associated with the festival and carry the principles of faith, justice, equality, and devotion in our hearts.

Navratri teaches us that its message should not be limited to just nine nights of worship. It represents much more than devotion; it inspires us to follow the path of truth, courage, and righteousness.

**Jai Mata Di!**

# Navratri: Faith and Strength



Student Name: Anvi Suhas Walke
Class: 7th Orchid
Topic: Article Writing – Navratri
School: RKL Galaxy International School

We worship the Goddess of strength—but do we create a society where women can live fearlessly?

Every year, Navratri fills India with devotion, vibrant colours, and the rhythmic beats of Garba. Dedicated to Goddess Durga and her nine forms, this festival celebrates courage, wisdom, and the victory of good over evil.

However, Navratri is more than nine nights of celebration. Goddess Durga's victory over Mahishasura reminds us to stand against injustice and discrimination. Her strength inspires us to build a society where women receive equal opportunities, dignity, and respect.

However, worshipping feminine strength must go beyond prayers and rituals. True devotion means respecting women, supporting their dreams, and ensuring that they can live without fear.



Navratri also teaches us that true strength lies in standing up for what is right. Goddess Durga represents fearlessness and determination, inspiring us to challenge outdated beliefs and bring equality and justice into our daily lives. The festival connects generations through traditions and devotion, making its message even more meaningful.

**"She stands with courage, she rises with grace,**
**A symbol of strength no fear can erase.**
**Like Maa Durga, bold and bright,**
**Every woman deserves her right.**
**Not just in prayers, but in what we do,**
**Let respect and equality shine through."**

The true spirit of Navratri lies not only in worshipping divine strength but also in practising courage, kindness, and equality every day.

Let us honour Goddess Durga not just through our prayers but by creating a world where every woman can live with dignity, confidence, and freedom.